पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

**मा.विधी समिती**

कार्यपत्रिका क्रमांक - ४

**सभावृत्तांत**

दिनांक - **०६/०१/२०१७** वेळ - दुपारी **३.००** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.विधी समितीची पाक्षिक सभा शुक्रवार दिनांक **०६/०१/२०१७** रोजी दुपारी **३.००** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

**१. मा.आल्हाट मंदा उत्तम - सभापती**
२. मा.आर.एस.कुमार
३. मा.भारती फरांदे
४. मा.लोखंडे गोरक्ष जाकाराम
५. मा.बाबर शारदा प्रकाश

या शिवाय मा.डोईफोडे – सहा.आयुक्त, मा.उल्हास जगताप - नगरसचिव, हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

**उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आले.**

विषय क्र.२) प्रभाग क्र.३ चिखली सोनवणेवस्ती येथे कॉंक्रीट पेव्हींगब्लॉक बसविणेबाबत – मा.आर.एस.कुमार, मा.शारदा बाबर यांचा प्रस्ताव.

विषय क्र.३) फ क्षेत्रीय कार्याक्षेत्रातील प्रभाग क्र.३ मधील डांबरीकरणाच्या कामाबाबत – मा.आर.एस.कुमार, मा.शारदा बाबर यांचा प्रस्ताव.

विषय क्र.४) प्रभाग क्र.३ चिखली मोरेवस्ती मधील चिखली आकुर्डी रस्त्यापासून तळवडे रस्त्याला जोडणारा अंतर्गत मुख्य रस्ता विकसीत करणेबाबत – मा.आर.एस.कुमार, मा.शारदा बाबर यांचा प्रस्ताव.

विषय क्र.५) प्रभाग क्र.२८ मधील मोरवाडी कोर्ट ते W-Sector कडे येणारा DP रस्ता विकसीत करणेबाबत – मा.आर.एस.कुमार, मा.शारदा बाबर यांचा प्रस्ताव.

----------

खालीलप्रमाणे सुचना मांडणेत आली.

सुचक – मा.आर.एस.कुमार                                        अनुमोदक – मा.शारदा बाबर

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची मा.विधी समितीची दिनांक ०६/०१/२०१७ ची पाक्षिक सभा शनिवार दिनांक ०७/०१/२०१७ रोजी सकाळी ११.३० वाजेपर्यंत तहकूब करणेत यावी.

सदर सुचना सर्वानुमते मान्य झाली.

----------

**सभापती -** शनिवार दिनांक ०७/०१/२०१७ रोजी सकाळी ११.३० वाजेपर्यंत सभा तहकूब करणेत येत आहे.

**( आल्हाट मंदा उत्तम )**
**सभापती**
विधी समिति
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

**मा.विधी समिती**

कार्यपत्रिका क्रमांक - ४

**सभावृत्तांत**

( दिनांक **०६/०१/२०१७** ची तहकूब सभा )

दिनांक - **०७/०१/२०१७** वेळ - सकाळी **११.३०** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.विधी समितीची दिनांक ०६/०१/२०१७ ची तहकूब सभा शनिवार दिनांक **०७/०१/२०१७** रोजी सकाळी **११.३०** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

**१. मा.आल्हाट मंदा उत्तम - सभापती**
२. मा.नंदा विकास ताकवणे
३. मा.भारती फरांदे
४. मा.लोखंडे गोरक्ष जाकाराम
५. मा.बाबर शारदा प्रकाश

या शिवाय मा.डोईफोडे – सहा.आयुक्त, मा.उल्हास जगताप - नगरसचिव, हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

दिनांक **१६/१२/२०१६** रोजी झालेल्या सभेचा **(कार्यपत्रिका क्रमांक ३)** सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

---------

ठराव क्रमांक – १६ विषय क्रमांक – ०१
दिनांक – ०७/०१/२०१७
सुचक – मा.आर.एस.कुमार अनुमोदक – मा.नंदा ताकवणे
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.प्रशा/२/कावि/६१०/२०१६, दि.२२/१२/२०१६

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयाकरीता स्वतंत्रपणे पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम ( Post Graduate Institute ) सुरु करणेचे अनुषंगाने करावयाच्या कार्यवाहीबाबतचे कामकाज करणेकामी शासन सेवेतील अनुभवी व वैद्यकीय क्षेत्रातील तज्ञ अधिका-याची प्रतिनियुक्तीने नियुक्ती होणेकामी शासनाकडे मागणी करण्यात आली होती.त्यानुसार शासनाचे वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग,महाराष्ट्र शासन, यांनी आदेश क्र.बदली-२०१६/प्र.क्र.१६५/१६/वै.सेवा-१ दि.१५ ऑक्टोबर,२०१६.चे आदेशान्वये डॉ.पद्माकर पंडित, प्राध्यापक, औषध शास्त्र, डॉ.वै.शा.शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, सोलापूर यांची पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयात विशेष कार्य अधिकारी या पदावर प्रथमत: दोन वर्षाकरीता प्रतिनियुक्तीने नियुक्ती केली

असून शासनाचे नगर विकास विभागाने त्यांचेकडील पत्र क्र.पीसीसी-३०१६/प्र.क्र.६७६/नवि-२२ दि.०८ नोव्हेंबर, २०१६ अन्वेय डॉ.पद्माकर पंडित यांना ०१ वर्ष कालावधीसाठी प्रतिनियुक्तीने केलेल्या नेमणूकीस मान्यता दिली आहे.त्यानुसार डॉ.पद्माकर पंडित यांना आदेश क्र.प्रशा/२/कावि/५७७/२०१६ दि.२१/११/२०१६ अन्वये (दि.१८/११/२०१६ रोजी मध्यान्हपूर्व पासून) प्राध्यापक, पिंपरी चिंचवड महानगरपालिका या पदावर रूजू करुन घेण्यात आले आहे. डॉ.पद्माकर पंडित, यांना प्राध्यापक, पिंपरी चिंचवड महानगरपालिका या पदावर मा.शासन आदेश दि.१५/१०/२०१६ मधील अटींच्या अधिन तसेच महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी, स्वीयेत्तर सेवा आणि निलंबन, बडतर्फी व सेवेतून काढून टाकणे यांच्या काळातील प्रदान) नियम १९८१ मधील नियम ४० मधील परिशिष्ट दोन मध्ये विहित अटी व शर्तींच्या अधिन राहून प्रतिनियुक्तीने करण्यात आलेल्या नियुक्तीस मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

**सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले.**

ठराव क्रमांक – १७ विषय क्रमांक – ०२

दिनांक – ०७/०१/२०१७

सुचक – मा.आर.एस.कुमार अनुमोदक – मा.शारदा बाबर

संदर्भ – मा.आर.एस.कुमार, मा.शारदा बाबर यांचा प्रस्ताव -

चिखली मोरेवस्ती प्रभाग क्र.३ मधील सोनवणेवस्ती येथे कॉंक्रीट पेव्हींग ब्लॉक बसविणे कामांचा अंतर्भाव करणेत आलेला आहे. तथापि सन्मा.सदस्य व नागरिकांच्या मागणीनुसार प्रभाग क्र.३ मध्ये पाटीलनगर, अंजनीगाथा स्किमजवळ, शेलारवस्ती (७/५०-२०१५-१६) हॉटेल त्रिमुर्ती जवळील रस्ता व श्रीनाथ प्रा.लि. जवळील रस्त्याचे काम करणेत आलेले आहे. त्यास कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – १८ विषय क्रमांक – ०३

दिनांक – ०७/०१/२०१७

सुचक – मा.आर.एस.कुमार अनुमोदक – मा.शारदा बाबर

संदर्भ – मा.आर.एस.कुमार, मा.शारदा बाबर यांचा प्रस्ताव -

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या फ प्रभाग कार्यक्षेत्रातील प्रभाग क्र.३ मोरेवस्ती चिखली प्रभागातील सन २०१६-१७ च्या अंदाजपत्रकातील तरतुदीनुसार खालीलप्रमाणे निविदा काढणेत आलेल्या आहेत.

| अ.क्र. | कामाचे नाव | निविदा क्रमांक | निविदा र.रु. |
|---|---|---|---|
| १ | प्रभाग क्र.३ चिखली धर्मराजनगर व बगवस्ती व इतर ठिकाणी रस्ते विकसीत करणे. | २०/१२२-२०१६-१७ | ५५,८३,८४५/- |

| | | | |
|---|---|---|---|
| २ | फ क्षेत्रीय कार्यालयांतर्गत साने चौक ते चिखली चौक या रस्त्यांचे डांबरीकरण करणे. | २०/५१-२०१६-१७ | ५६,००,०५६/- |
| ३ | प्रभाग क्र.३ चिखली येथील शेलारवाडी येथील MIDC भागातील रस्त्यांचे हॉटमिक्स पध्दतीने डांबरीकरण करणे. | ४४/४२-२०१६-१७ | ४६,६८,३३९/- |
| ४ | प्रभाग क्र.३ चिखली येथील सोनवणे वस्ती व रामदासनगर येथील अंतर्गत रस्त्यांचे हॉटमिक्स पध्दतीने डांबरीकरण करणे. | ४४/२९-२०१६-१७ | ४६,६८,३३९/- |

तथापि सन्मा.सदस्यांच्या मागणीनुसार प्रभाग क्र.३ मधील सानेचौक ते चिखली गावठाण चौक पर्यंतच्या सुमारे २.४० कि.मी.रस्त्याचे डांबरीकरण करणेसाठी शिफारस केली आहे. सदर रस्त्याची लांबी २.४० कि.मी.रुंदी (सरासरी ९.०० मी.) इतक्या लांबीचे डांबरीकरण करावयाचे झाल्यास सदर कामाच्या व्याप्तीत बदल करणे आवश्यक आहे. सदर कामाच्या एकत्रित रकमेतून साने चौक ते चिखली चौकापर्यंतच्या रस्त्याचे काम करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – १९ विषय क्रमांक – ०४

दिनांक – ०७/०१/२०१७

सुचक – मा.आर.एस.कुमार अनुमोदक – मा.शारदा बाबर

संदर्भ – मा.आर.एस.कुमार, मा.शारदा बाबर यांचा प्रस्ताव -

प्रभाग क्र.३ चिखली मोरेवस्ती मधील चिखली आकुर्डी रस्त्यापासून तळवडे रस्त्याला जोडणारा अंतर्गत मुख्य रस्ता तसेच वाघु साने चौक ते तळवडे रस्त्याला जोडणारा रस्ता विकसीत करण्याचे नियोजन आहे. तरी कामाची जागा ताब्यात व्याप्तीमधील बचतीतून तत्कालीन परिस्थितीत उपलब्ध निविदांचा सर्वंकष विचार करुन प्रभाग क्र.४ कृष्णानगर व प्रभाग क्र.९ संभाजीनगर येथील आवश्यक रस्त्यांची कामे सन्मा.नगरसदस्य व नागरिकांच्या मागणीनुसार करण्यात आलेली आहेत. तसेच तळवडे रस्त्याकडील जाणा-या रस्त्याची जागा उपलब्ध नसल्याने सदर कामातून बालाजी इंग्लिश मेडियम स्कूल परिसरातील रस्ते करणेत आलेले आहेत. सदर कामास कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – २० विषय क्रमांक – ०५

दिनांक – ०७/०१/२०१७

सुचक – मा.आर.एस.कुमार अनुमोदक – मा.शारदा बाबर

संदर्भ – मा.आर.एस.कुमार, मा.शारदा बाबर यांचा प्रस्ताव -

प्रभाग क्र.२८ मधील मोरवाडी कोर्ट ते W-Sector कडे येणारा DP रस्ता विकसीत करणेचे काम सन २०१६-१७ च्या अंदाजपत्रकामध्ये सुचविणेत आलेल्या प्रभाग क्र.२८ मधील कामांची निविदा

क्र.२०/१७-२०१६-१७ नुसार काढणेत आलेले असून कार्यादेश दि.१०/१०/२०१६ नुसार देणेत आलेले आहेत. सदर प्रभाग क्र.२८ मधील मोरवाडी कोर्ट ते W-Sector कडे जाणारा रस्ता तयार करणेसाठी मनपा कलम २०५ नुसार जागा ताब्यात घेणेची कार्यवाही चालू असलेमुळे जागा उपलब्ध नाही. सदरचे काम कालमर्यादित होणे आवश्यक आहे. सदरमुळे होणारा विलंब टाळणेकामी याच प्रभागातील रसरंग चौक ते W सेक्टर रस्त्याचे काम करणे तांत्रिकदृष्टया अत्यंत आवश्यक असल्याने त्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**( आल्हाट मंदा उत्तम )**
**सभापती**
विधी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/२७/२०१७
दिनांक : ०७/०१/२०१७



**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकड पुढील योग्य त्या
कार्यवाहीसाठी रवाना.

Z:\e drive\Nagersachiv1\New Folder\Ele 2016 sub committee sabhapati.doc